MAH/MUL/03051/20
ISSN-2319

multilingual Research Journal

# VIDYAWARTA®

Issue-19, Vol-01, July to Sept.2017

Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

http://www.vidyawarta.blogspot.com | http://sites.google.com/site/vidyawartajournal

## || Index ||

1) ENHANCNING CREATIVE PROBLEM SOLVING ABILITY OF TEACHER TRAINNES THROUGH......
**Anupriya Kumari—Dr. Vinita Singh Gopalkirshnan, Rajasthan** || 09

2) ROLE OF NON GOVERNMENTAL ORGANIZATIONS IN PROVIDING EDUCATION TO.......
**RUCHI GARG, Delhi** || 14

3) Judicial Review: The last Resort from Majoritarian Government
**Gulam Kader Joiya, Churu** || 20

4) ADJUSTMENT PROBLEM FACED By CHILDREN WITH LEARNINNG DISAILITIES IN ........
**Deepti Gupta—Dr. Mala Tandon, Lucknow** || 25

5) Impact of Online & Offline Shopping on Consumers buying Behaviors
**Hetal Rupareliya, Rajkot, Gujarat** || 30

6) Reflection of Violence to Women in the Plays of Vijay Tendulkar
**Dr. Anant Vithalrao Jadhav, Sirsala, Dist. Beed M.S.** || 34

7) AN EMPIRICAL STUDY ON AWARENESS AND UTILIZATION OF AGRICULTURE ...........
**Ms. R. S. KANIMOZHI, PEELAMEDU, COIMBATORE** || 37

8) Diet & Nutrition Healthy Eating & Balanced Diet
**Mohini Tyagi—Dr. Sunita Arya, Uttar Pradesh** || 47

9) Awareness of Human Rights among Buddhist Population–A case of Vidarbha
**Dr. Shuchismita Mishra, Nagpur** || 49

10) Significance of Fundamental Rights Vis A Vis Directive Principles: A Constitutional......
**Dr. Virender Negi—Dr. Monika Negi.** || 54

11) Indian Scenario of E-Commerce with Respect to Analysis of Global Trend
**RAHUL CHAUHAN, Rajkot, Gujarat** || 62

12) Low Quality Research in Teacher Education: Some Causes
**Dr. Pargat Singh, Gurusar Sadhar, Ludhiana** || 68

13) Autism Spectrum Disorder: A Review Paper
**Dr. Ved Prakash Rawat—Anupama Singh, Varanasi, U.P.** || 70

14) Effect of concept mapping strategy in mathematics on mathematical creativity in.....
**Dr Khushvinder Kumar—Jaskaranjeet Singh** || 76

15) Future prospects of Online Stores And E-Business in India
**Prof. Anand Sengupta—Dr. Nitin Kumar Bakhshi, Gorakhpur** || 80

https://sites.google.com/site/vidyawartajournal — http://www.vidyawarta.blogspot.com

16) Designing evaluation framework for social media tools: An Analytical Hierarchy Process approach
Navneet Kumar Sharma, Varanasi, U.P. || 87

17) Use of Flashback Technique in the Novel The Foreigner
Kuldeep Singh || 90

18) BRANDING – Way towards a Successful Business
Sarika Kumar, Delhi || 93

19) Role of Media in Women Empowerment
Sanoj Singh—Prabha Rani, Gajraula, Amroha || 95

20) ROLE CONFLICT AS RELATED TO EDUCATIONAL QUALIFICATION AND CHANGE PRONENESS .........
Sapna Sen—Dr. Vishal Sood, Shimla ||101

21) वऱ्हाडी आणि अहिराणी म्हणींतील स्त्री-प्रतिमांचा:तौलनिक अभ्यास
पुरुषोत्तम सदानंद तायडे–प्राचार्य डॉ. बाळासाहेब गुंजाळ || 107

22) मुंबईमधील अंधेरी तालुक्यातील परांजपे विद्यालयातील इ.७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी विषयातील पत्रलेखन .....
राजू बंडगर, राजस्थान || 110

23) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना निर्माण होणाऱ्या ताणतनावांचे अध्ययन
प्रा.एम.बी.रेवतकर, चिमूर || 113

24) महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील चळचळीत स्त्रियांचा सहभाग:एक समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा. बनसोडे एस. एस., सरुड, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर. || 116

25) अरुण कोलटकरच्या कविता या कवितासंग्रहातील आशयसूत्रे
डॉ. वैजयंतीमाला जाधव–भोसले, विद्यानगर, पुणे || 119

26) डीजीटायझेशन:तांत्रिक अभ्यास आणि प्रक्रिया
प्रा. हितेश गोपाल ब्रिजवासी–प्रा. चंद्रशेखर डी. वाणी. || 128

27) परभणी जिल्हयातील अनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयात सिक्स सिग्मा या तंत्राचा प्रभाव : एक अभ्यास
श्री. धनंजय एल. मोतेवार-डॉ. सौ. शालीनी एम. साखरकर, सावनेर, जि. नागपूर || 132

28) अंमली पदार्थ : स्वरुप व परिणाम
प्रा. जे. के. ससाणे, नेसरी, ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर || 135

29) रागों के सौन्दर्यात्मक पक्ष के अनुसार समय तथा ऋतु सिद्धान्त का विश्लेषणात्मक अध्ययन
दीपक कुमार कुकरेजा, दिल्ली || 140

शील येत होता. त्याला या कवितेने पूर्णपणे ाटा दिला. यापेक्षा वेगळे असे महानगरीय जग, येथील दैनंदिन राहणी या साऱ्याचे चित्रण मर्ढेकरांच्या कवितेतून प्रभावीपणे येते.

उदा.

"सकाळी उठोनी। चहा कॉफी घ्यावी
तशीच गाठावी। वीज गाडी"
(मर्ढेकरांच्या कविता, पृ.क्र.३२)

महानगरातील लोकांचे राहणीमान, नोकरीच्या निमित्ताने त्यांचे बाहेर पडणे, तेथील समस्या, त्याला आलेले क्षुद्रत्व यासारख्या अनेक गोष्टी मर्ढेकरांच्या कवितेतून आल्या.

विविध घडामोडींचे केंद्र म्हणून प्रामुख्याने महानगराकडे पाहिले जाते. अर्थव्यवहाराची, बौद्धिक आणि सांस्कृतिक घडामोडींची केंद्रे, महत्त्वाची सूत्रे महानगरांमध्येच हलवली जातात. आधुनिकवादाचा जन्म हाही महानगरांमध्येच झालेला दिसतो. एकूणच महानगरातील या साऱ्या घटकांनीच महानगरीय संवेदन आकाराला येते. कोलटकरांच्या कवितेमध्ये आढळणारे महानगरीय संवेदन हेही असेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. कोलटकर अनेक वर्षे मुंबईमध्येच राहत होते. मुंबईसारख्या महानगरीय वास्तव्यात असताना तेथील अनेक संस्कार त्यांच्या कवितेवरही जाणवतात. त्यांच्या कवितेमध्ये महानगरीय संस्कृती, तेथील लोकांचे राहणीमान, स्त्री–पुरुष संबंध, बकालपणा, दारिद्र्य, रोजच्या जगण्यासाठी त्यांना करावी लागणारी धडपड या साऱ्यामुळे त्यांच्या जगण्यात येणारी क्षुद्रता याचे चित्रण येते. महानगरामध्ये मनुष्याला एकाकी वाटते. सांस्कृतिकदृष्ट्याही त्याचे विघटन झालेले असते. त्यामुळे र, नोकरीचे ठिकाण याठिकाणी त्याचे वर्तन हे वस्तुनिष्ठ रसते. कोलटकरांच्या कवितेत येणारी व्यक्ती ही कामाच्या ठिकाणी महिन्याच्या शेवटच्या तारखेला पगार ागते. मॅनेजरचा नकार मिळताच त्याचेच घड्याळ ऊन त्याला पोलिस स्टेशनचा रस्ता दाखवण्यास कमी रत नाही. मालक आणि नोकर यांच्यातील पारंपरिक तेसंबंधाला या ठिकाणी फाटा मिळाला आहे.

उदा.

"मैं मॅनेजरको बोला मुझे पगार मंगता।
मॅनेजर बोला कंपनीके रूलसे पगार
एक तारीखको मिलेगा।
उसकी घडी टेबलपे पडी थी, मैने घडी उठाके लिया
और मॅनेजरको पुलिस चौकीका रास्ता दिखाया
बोला अगर कंप्लेट करना है तो करलो
मेरे रूलसे पगार आजही होगा" (पृ.७२)

या ठिकाणी मालक आणि नोकर यांचे संबध बदलण्याचे कारण येथील भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे. मालक–नोकर संघर्ष हा त्याचेच एक रूप आहे. महानगरीय अर्थव्यवस्था ही भांडवलशाहीचा पगडा असलेली आहे. याठिकाणी बेकारीमुळे नोकरीसाठी संघर्ष वाढला आहे आणि खूप प्रयत्न करूनही नोकरी धंद्याचे कोणतेच साधन हाताशी मिळत नाही. त्यामुळे भ्रमनिरास झालेला तरुण वर्गही याठिकाणी मोठ्या प्रमाणात आहे. कोलटकरांच्या कवितेत हा तरुणवर्गही येताना दिसतो. बर्माला पिक्चर बघायला गेलेल्या तरुणाला पोलिस तिकडे जाण्याचे कारण विचारतात. तेव्हा तोच त्यांना 'इंडियामें रखखाही क्या है?' असा प्रतिप्रश्न विचारतो. स्वातंत्र्योत्तर कालखंडात महानगरांमध्ये वेगवेगळ्या स्वप्नांना घेऊन आलेल्या तरुणांचा जो भ्रमनिरास झाला होता. त्याचेच हे प्रातिनिधिक उदाहरण आहे. महानगरातील वास्तव्यात सर्वच बाजूंनी निराशा पदरी पडल्यावर एकूणच भारताविषयी तरुणांच्या मनात जी नकारात्मक भावना मूळ धरू लागली. याचे कारण महानगरीय परिस्थिती ही होती. यातूनच विशिष्ट अशा प्रकारचे महानगरीय संवेदन तयार होत गेलेले दिसते. महानगरामध्ये जगणारा प्रत्येक माणूस हा विविध गुंतागुंतीच्या प्रश्नांनी जखडलेला असतो. जन्म, मृत्यू याविषयी त्याच्या भावना अतिशय लवचिक होत गेलेल्या असतात. जन्माविषयी आनंद, मृत्यूविषयी खेद याहीपलीकडे त्याचे वर्तन असते. अशाप्रसंगी तो अतिशय तटस्थ असतो. 'न्यू येर डे' या कवितेत असाच एक तटस्थ निवेदक दिसून येतो. निवेदकाचेच दोन मुलुखवाले मृत्यू पावतात. त्यांच्या मृत्यूविषयीचा तपशील अतिशय थंडपणे तो निवेदन करतो.

"टॅक्सी ड्रायव्हर था. न्यू येर डे.
उसका क्या हो गया? औरत था.

25

# अरुण कोलटकरच्या कविता या कवितासंग्रहातील आशयसूत्रे

डॉ. वैजयंतीमाला जाधव–भोसले
द्वारा अमित बळवंत भोसले
विद्यानगर, पुणे

***********

प्रस्तुत लेखात अरुण कोलटकरांच्या कवितेतील आशयसूत्रांचा अभ्यास केला आहे. अरुण कोलटकरांचा 'अरुण कोलटकरांच्या कविता' (१९७७)साली प्रकाशित झाला . १९६० च्या दशकात लघुनियतकालिकांची चळवळ चालू झाली. यामध्ये मुख्यत: कविता हा वाङ्मयप्रकार हाताळलेला दिसतो. या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींनी कवितेच्या माध्यमातून या दशकावर स्वत:चा असा वेगळा ठसा उमटवलेला दिसतो. यामध्ये अरुण कोलटकरांच्या कवितेनेही भर घातली. या लेखात कोलटकरांच्या कवितेतील काही महत्त्वाच्या आशयसूत्रांची नोंद घेतली आहे.

## १) अरुण कोलटकरांच्या कविता (१९७७):

अरुण कोलटकरांचा 'अरुण कोलटकरांच्या कविता' हा पहिला कवितासंग्रह १९७७ साली प्रास प्रकाशनाने प्रसिद्ध केला. हा संग्रह जरी १९७७ साली प्रकाशित झाला असला तरी या कवितांचा लेखनकाळ हा १९५५ ते ६० च्या सुमाराचाच आहे. कोणत्याही कवीच्या कवितेतील आशयसूत्रांचे आकलन होण्यासाठी तो कवी नेमक्या कोणत्या परंपरेत काव्यलेखन करतो हे पाहणे अत्यंत गरजेचे असते. त्यामुळे कोलटकरांच्या काव्यलेखनाची परंपरा नेमकी कोणती आहे हे समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. पहिल्या प्रकरणात त्याचा सविस्तर आढावा घेतला आहे. मराठी कविता परंपरेप्रमाणेच युरोपीय कवितापरंपरेची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये कोलटकरांच्या कवितेत आढळतात. पण युरोपीय कवितेचे अनुकरण या कवितेने केले असे म्हणता येत नाही. विशेषत: या युरोपीय कवितेच्या छटा त्यांच्या 'अरुण कोलटकरांच्या कविता' या संग्रहात अधिक्याने जाणवताना दिसतात.

परात्मता, मृत्यूची जाणीव, एकटेपणा, स्वत्वलोप माणसाचे होत जाणारे अमानवीकरण अशी काही महत्त्वाची आधुनिकवादी सूत्रे त्यांच्या कवितालेखनात आढळतात. कवितेच्या रचनातंत्राच्या बाबतीतही अनेक ठिकाणी त्यांनी सिम्बॉलिक (Symbolic) म्हणजे प्रतीकवादी रचनातंत्राचा वापर केलेला दिसतो. उदा.

"माझ्या डोळयांच्या फसव्या
नरमांसभक्षक झुडपातून" (पृ.क्र.३२)

याठिकाणी डोळे; झुडुप या शब्दांशी संबंधित अर्थाचे सूचन करणारे दृश्य डोळ्यांसमोर उभे राहते. पण येथे या शब्दाच्या एकत्रीकरणाने निर्माण होणारे दृश्य हे पारंपरिक दृश्यरचनेला छेद देणारे आहे. या ठिकाणी भाषेच्या अस्तित्वात असलेल्या शक्यतांच्या पलीकडे जाऊन भिन्न अर्थाचे सूचन वेगवेगळ्या प्रतीकांच्या माध्यमातून केले आहे. आणि नेहमीच्या भाषिक व्यवस्थेला याठिकाणी ही कविता सतत नकार देताना दिसते. अशा वेगवेगळ्या मुद्दयांच्या आधारे या संग्रहातील कवितांच्या प्रमुख आशयसूत्रांची नोंद घेतली आहे.

## १. महानगरीय संवेदन:

मर्ढेकरांच्या कवितेपासून मराठी कवितेमध्ये महानगरीय जाणिवेच्या छटा दिसून येतात. औद्योगिकीकरणानंतरचा हा कालखंड वेगवेगळ्या गुंतागुंतीच्या घटनांना सामोरे जात होता. यंत्र संस्कृतीने निर्माण केलेल्या रोजगारांच्या संधीमुळे बहुसंख्य लोक महानगराकडे धाव घेत होते. परिणामी महानगरे अधिकाधिक विस्तारू लागली. वेगवेगळ्या जाती–धर्माचे, आर्थिक स्तरात भिन्नता असलेले लोक या सर्वांनी मिळून एक नवी महानगरीय संस्कृती उदयाला आली होती. मर्ढेकरांच्या कवितेपासून या महानगरीय संस्कृतीच्या विविध छटा आविष्कृत होऊ लागल्या. या पूर्वीच्या रोमँटिक कवींच्या काव्यलेखनातून येणारा निसर्ग, त्यामधील झाडे, नदी, झरा, खेडेगाव अशा प्रकारचा

पीनेवाला आदमी.
वो तो सोयेला था. खाली
चार दिन हो गया. पाच—छं समझो
औरतने क्या किया?
उसके उपर पेट्रोल डाला.
और काडी लगाया. सचही.
और बादमे खुदको.
वो तो मर गयी. हां बेचारी,
वो तो जिंदा है. हॉस्पिटलमे.
पहेचानवाला था
देख भी नही सकता. नही. बिलकुल
औरत? औरत तो मर गयी
चरबी होता है ना?" (पृ.७४)

महानगरामध्ये उपजिवीकेसाठी टॅक्सी चालवणारा ड्रायव्हर, त्याचे दारू पिणे, त्याच्या दारूच्या व्यसनाला कंटाळलेली त्याची बायको, तिने नवऱ्याला आणि स्वत:ला पेटवून घेणे या साऱ्याचा तपशील सविस्तरपणे कथन न करता अतिशय मोजक्या आणि सूचक शब्दात या साऱ्या घटनेमागील दाहक वास्तव प्रकट होत आहे. अपुरे शिक्षण, त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या अर्थाजनाच्या तुटपुंज्या संधी आणि त्यातच कुटुंबाची जबाबदारी अशा गुंत्यात महानगरातील प्रत्येकजणच अडकला होता. या साऱ्यातून जो ताण निर्माण होत होता. त्यातून सुटका मिळवण्यासाठी तो विविध व्यसनांच्या आहारी जाऊ लागला, नशा करू लागला. परिणामी कुटुंबाकडे दुर्लक्ष होऊ लागले. व्यसन, बेकारी, दारिद्र्य या साऱ्याला कंटाळून शेवटी आत्महत्येचा मार्ग स्वीकारणाऱ्यांची संख्या वाढली. एकाकीपणा, मानसिक दुभंगलेपण यातून काहीजण व्यसनातच बुडून गेले. यावर मात करण्यासाठीची सक्षम अशी साधने या वर्गाच्या हाती नव्हती. याला कारण महानगरांची घडणही तशीच होती. भिन्न भिन्न संस्कृती असलेले, वेगवेगळ्या स्तरांतील लोक महानगराने सामावून घेतले होते. प्रत्येकाची मानसिक अवस्था वेगळीच होती. त्यामुळे या भिन्न भिन्न समूहाचे भावनिकबंध जुळून येणेही कठीण होते. त्यामुळे आधारासाठी प्रत्येकजणच धडपडत होता. त्यातूनच एकाकीपणाची, वैफल्याची भावना वाढीस लागली. महानगरामधील मूल्यरचनाही वेगळी होती. नैतिक—अनैतिकतेच्या संकल्पना माणूसपरत्वे बदलणाऱ्या होत्या. कोलटकरांच्या कवितेतून याचा प्रयत्न येतो.

"मै भाभीको बोला
क्या भाईसाबके ड्यूटीपे मै आ जाऊँ?
भडक गयी साली
रहमान बोला गोली चलाउंगा
मै बोला एक रंडीके वास्ते?
चलाव गोली गांडू" (पृ.७२)

कवितेतील निवेदकाने अत्यंत उपरोधिक अंगाने समोरच्या व्यक्तीशी संवाद साधला आहे. भाईसाब, भाभी या उल्लेखांबरोबर त्या शब्दांना चिकटून येणारे अध्याहृत नाते यामध्ये विचारात घेतलेले नाही. एकूणच या वक्तव्यातून अनैतिक गोष्टींना वरवर नैतिकतेचा मुखवटा चढवलेंला दिसतो. परंपरागत नातेसंबंधाच्या पलीकडे जाऊन याठिकाणी वेगळ्याच पद्धतीने परिस्थितीला हाताळलेली आहे. वेगवेगळी सांस्कृतिक रचना, मूल्यरचना, पारंपरिक नातेसंबंध यांच्या नेहमीच्या घडणीला महानगरामध्ये फाटा मिळालेला दिसतो. यासंदर्भात प्रकाश देशपांडे—केजकर म्हणतात, "महानगरीय संस्कृतीच्या रोगट, भ्रष्ट आणि विनाशकारी रूपाचे वास्तव चित्रण करणारी त्यांची कविता आहे. हा धिक्कार करताना ती हातचे काही राखत नाही. म्हणून तिच्यात एक सुप्त आक्रमण आणि हिंसक प्रवृत्ती दिसते. त्यांच्या औपरोधिक शैलीमुळे हा धिक्कार अधिक परिणामकारक ठरतो. महानगरीय संस्कृतीत कसेबसे जगणाऱ्या, तिची अमानुषता, असुरक्षितता, कंटाळवाणेपणा आणि आर्थिक पिळवणूक यांचा बळी ठरलेल्या महानगरीय माणसाची ही अगतिकता आहे. महानगरीय जीवनात होणारी स्त्री पुरुष संबंधाची विटंबना आपल्या औपरोधिक शैलीत चित्रित करून कोलटकरांनी रोमॅंटिक भावकवितेच्या परंपरेला पहिला हादरा दिला. आधुनिक स्त्री—पुरुष संबंधातील भयावहतेचे एवढेच थंड, अलिप्त आणि खोचक चित्रण मराठी कवितेत क्वचितच झाले असते." महानगरासारख्या ठिकाणी वेगवेगळ्या खेड्यांमधून स्थलांतरीत झालेले लोक येतात. लोकसंख्येच्या वाढीचे ते एक महत्त्वाचे केंद्र असते. नवीन तंत्रपद्धती आणि

शैली, औद्योगिक सुधारणा, विभिन्न मानसिक ताण यांचेही मूळ महानगरच असते. सामाजिक भेदाच्या चौकटी महानगरामध्ये काहीशा धूसर होत जातात. परिणामी विविध संस्कृतीचे एकजीव रसायन याठिकाणी होऊ पाहते. साहजिकच या भिन्न संस्कृतीच्या मूल्यधारणा भिन्न स्वरूपाच्या असतात. या भिन्न संस्कृतीचे केंद्रीकरण ज्या महानगरामध्ये एकाच ठिकाणी होते तेथे वेगवेगळे ताण निर्माण होतात. बदललेल्या अशा स्वरूपाच्या नवीन संवेदनाचे एक जग याठिकाणी आकार घेते. बदललेल्या या जगात व्यक्ती—व्यक्तींमधील संबंधाचे स्वरूपही बदलते. त्यांचा मूल्यधारणेचा दृष्टिकोन हा बदलतो.

उदा.

"पायावर पाय देऊन एकजण म्हणाला
सॉरी यार सॉरी
डोळ्यात छत्री घालून एकजन म्हणाला
माफ करना भाई माफ करना
अंगावर ट्रक घालून एकजण म्हणाला
दिखता नही मादरचोद दिखता नही." (पृ.९९)

या बदललेल्या मूल्यांचे उपरोधिक अंगाने चित्रण कोलटकरांच्या कवितेत येते. पायावर पाय देणे, डोळ्यात छत्री घालणे, अंगावर ट्रक घालणे या घटना केवळ निमित्तमात्र आहेत. आणि त्या जणू काही क्षुल्लक आहेत. असे चित्र उभे केले आहे. जाणीवपूर्वक कश्तींना अजाणतेपणाचा भाव देऊन या घटनांना कवीने बदललेल्या मूल्यव्यवस्थेच्या संदर्भात अधिकच उठळक केले आहे. महानगरातील यंत्रसंस्कृतीच्या भयावह स्वरूपाचे अनेक संदर्भ कोलटकरांची कविता अधोरेखित करते.

उदा.

"बाई ग तू कोणीही अस
भटीण घाटीण किरिस्ताव
इथ नाही भेदभाव
पदर खोच
अन् मुकाट्यानं घर गाठ
तू म्हातारी की तरणी
ते पण ही गिरणी
विचारणार नाही." (पृ.क्र.८६)

गिरणी ही यंत्रसंस्कृतीचे एक प्रतीक आहे. ही माणसांमाणसामध्ये कोणताही भेदभाव करत नाही. स्त्री—पुरुष, तरुण—वृद्ध, जात—पात या तपशिलात खोल जाण्याची तसदी घेण्याएवढा वेळ इथे कोणाकडे नाही. महानगरामध्ये आयुष्याचा क्रम हा वेगवान तर आहे. पण जे अस्तित्वात आहे ते स्वीकारल्यावाचून या ठिकाणी वेगळे कोणतेच पर्याय नाहीत.

"बिनभुयार हे जग हे लाक्षागृह
निरुपाय निरुपाय आगीचे बंब
वाळूच्या बादल्या पाण्याच्या टाक्या" (पृ.८६)

जिथे आपण जगतो आहोत त्याला सामोरे गेलेच पाहीजे. कोणतीही समस्या आली तरी त्याला सामोरे गेलेच पाहीजे. त्यातून बाहेर पडण्यासाठी कोणताही मार्ग नाही, कोणतीही भुयारांची सोय नाही. असे हे गुंतागुंतीचे आयुष्य आहे. या गुंतागुंतीच्या आयुष्यात महानगर नेमके कसे आहे. तर हे महानगर म्हणजेही एक मोठे जंगलच आहे. महानगर हे कृत्रिम गोष्टींचे जंगल असल्याचा भाव साठनंतरच्या कालखंडातील कवितेमध्ये प्रामुख्याने दिसतो. फक्त हे महानगर असल्याने अस्तित्वात असलेले तपशील बदललेले आहेत.

उदा.

"राजाभाई टॉवर गेटवे ताज
मॅजेस्टिक हॉटेल
या इमारती श्वापंद कोल्हे वाघ रानडुकरं
हे जंगल घडीव हा स्पष्ट अंधार
ही गिधाडं" (पृ.८७)

जंगलातील अंधारापेक्षाही महानगरातला अंधार वेगळा आहे आणि यामध्ये जाणीवपूर्वकता आहे. कारण महानगर ही घडवलेली जंगलच आहेत. मोठमोठ्या इमारती, टॉवर हे गर्दी करून एकमेकांशेजारी उभे आहेत. इथे श्वापंदही आहेत. माणसामधल्या पाशवी वृत्तीची ही श्वापदं जंगलातील श्वापदाप्रमाणे मोकाट सुटलेली आहेत. त्यांच्यातील हिंसक प्रवृत्तीचा, आक्रमकपणाचा मेळ कोलटकर पशूंशी घालतात.

कोलटकरांची कविता एकूणच महानगरीय संस्कृतीचा त्यातील वृत्ती प्रवृत्तींचा वेध घेतेच शिवाय या कालखंडातील महानगरांमध्ये राहणाऱ्या माणसाच्या संवेदन स्वभावाचे दर्शनही आपल्या कवितेतून घडवते.

२) अमानवीकरण:

महानगरीय जाणिवेबरोबरच कोलटकरांची कविता अमानवीकरणाच्या प्रक्रियेचे चित्रणही तितक्याच ताकदीने घडवते. आधुनिक संस्कृतीतील या जगात वस्तूसृष्टी आणि प्राणिसृष्टी अस्तित्वात आहे. आणि त्या केवळ अस्तित्वात आहेत असे नाही तर त्या क्रियाशील असल्याचे संदर्भ या कवितातून येतात. निर्जिव वस्तूंचे स्वत:चे असे जग कोलटकरांच्या कवितेतून दिसून येते. या वस्तूंचे एक विशिष्ट प्रकारचे वर्तन आहे. त्या रागावतात, रूसतात तर कधी आनंदी असतात. ज्या कृती, अवस्थांतून सजीव सृष्टी जाते. त्याप्रमाणे त्यालाच समान पातळीवर निर्जिव सृष्टीमध्ये वेगवेगळे अवस्थांतर होते. मानवी भावभावनांनी निर्जिव सश्ष्टीचे जग व्यापले आहे. हे जग अधिक सुरक्षित असून प्रत्येकाची स्वत:ची एक ठराविक जागा आहे.

कोलटकरांच्या कवितेमध्ये निर्जिव सृष्टी कसे वेगवेगळे व्यवहार करते याचे जे उल्लेख आले आहेत ते पाहण्यासारखे आहेत. हे जग मानवी जगाला सतत आव्हान देते आहे. याठिकाणची इमारत पुढच्या दरवाज्याला आतून कडी लावून घेते आणि मागच्या दिंडी दरवाज्यातून बाहेर पडते, पुढे आपल्या जाराकडे निघून जाते. बेकाराने सिगारेट पेटवून झाल्यानंतर ठेवलेली जळणारी काडी चहाच्या वर्तुळात उठून बसते, मेणाचा ठिपका कढत सही करतो, आणि मेणबत्तीच्या वतीने जन्मठेप स्वीकारतो. काळोख मरणाच्या ओंजळीने चरित्र [illegible]तो, उमेदवार वात जन्माच्या टाळूतून गर्भाशयात निवडणुकीसाठी उभी असते. भांडवलदार ज्योत मुळासकट मेणबत्तीला खाऊन टाकते. किल्ल्या चघळत लठ्ठ कुलुपं घरोघरी झोपाळ्यावर पडून राहतात, वाऱ्यामुळे पार्शिणीचा फ्लॉवरपॉट गडाबडा लोळतो. रिंधिणीच्या साडीमागे बंगाल्याचा लेंगा लागतो, बिल्डींग मागच्या जागी झुलते आणि जरा लवून गुलमोहराच्या बुंध्याला गंडस्थळ घासते. खिडक्या आसडे देतात, भिंती एकमेकांत मिसळतात. या सर्व निर्जिव वस्तू दैनंदिन व्यवहार अगदी निर्धोकपणे करताना दिसतात. "या निर्जिव वस्तू केवळ स्वत:च्या जगापुरते आपले व्यवहार मर्यादित ठेवत नाहीत. त्या चल होऊन माणसाच्या स्थिर जगाला हादरे देतात. त्यांच्या हालचालीत वेग आणि प्रक्षोभ आहे. आणि त्यांच्या हालचालीचा पवित्रा आक्रमक आहे. बहुतेक वेळा त्या लढण्याच्या पवित्र्यात दिसतात." मानवी जगतावर आक्रमण करून त्यांच्याशी जणू काही स्पर्धा करण्याचा त्यांचा हेतू आहे असे वाटते. त्याचे वागणे हे अतिशय आक्रमक आहे.

उदा. "पायगतीच्या कांबळयानं झडप घातली बघ
कांबळं पसरतय अंगावर दशा कशा शिवशिवतायत
काळी बोट वळवळतायत
काळ लाट फुटली तुझ्या छाताडावर
काळी बोट विणतायत तुझ्या गळयाभोवती हळूहळू"

किंवा

"पळा पेंटर न्हाऊदे रंगाच डबडं
इयायरातपत्रा खडखड करतोय
तुम्हीच रंगवलेली पंचवीस फुटी हेलन
तुमच्या बोकांडी बसणाराय" (पृ.१०६)

निर्जिव वस्तूच्या आक्रमणापुढे सजीव सृष्टी हतबल आहे. हे निर्जिव वस्तूंचे जग माणसावर झडप घालते. त्यांच्या बोकांडीवर बसते. हे त्याचे आक्रमण माणसाला भयचकित करणारे आहे. कोलटकरांची कविता ही केवळ निर्जिव वस्तूंनी गजबजलेली नाही. तर त्यांच्या कृतींनीही ती भयचकित झाली आहे. या वस्तूंचे आक्रमण जणू मानवी जीवनाला अवकळाच प्राप्त करून देणार झाले आहे असे वाटते. कोलटकरांच्या कवितेत निर्जिव गोष्टींबरोबर पशुसृष्टीचेही एक वेगळे जग अस्तित्त्वात आहे. वस्तूंबरोबरच पशूंचेही हे जग मानवी जगाला शह देते. या जगातील सर्व पशूही माणसाचे व्यवहार करतात. चित्ते आणि चित्तिणी चांदणे पितात, माणसाची कुंडली भिंतीवरच्या पाली मांडतात, कोपऱ्यातला कोळी हस्तमैथून पाहतो, ढेकूण कामीजणांना चुचकारतात. पशुसृष्टी ही मानवी जगामध्ये प्रवेश करून मानवाबरहुकूम आपले सर्व व्यवहार करते. पण वस्तूसृष्टीच्या आक्रमणातून मानवाप्रमाणे यांची सुटका नाही. "वस्तुसृष्टीच्या मानाने पशुसृष्टी फारशी आक्रमक नाही. मनुष्यसृष्टीलाही अप्रत्यक्ष शह देते मनुष्यसृष्टीशी त्यांनी थोडासा द्रोहही पत्करला आहे. पण वस्तुसृष्टीच्या विनाशकारी आक्रमणाचे पशुही बळी आहेत. त्याचा परिणाम म्हणून हे पशू अनुत्सुक आणि निर्बळ दिसतात." उदा. प्रक्षुब्ध रणांगणावर मेलेली घोडी, उकिरड्याशेजारील

आळसट कुत्रा, खुर्चीखालील अंधाराना निमित्त झालेले मांजर, देवळात मेलेला बैल. ही सगळी पशुजगतावर आलेली अवकळा असून त्यांच्यातील पाशवी शक्तीचे खच्चीकरण होत आहे याचे निदर्शक आहे.

वस्तुजगत आणि पशुजगताबरोबरच माणसाचा होत जाणारा ऱ्हास कोलटकरांची कविता प्रकट करते. वस्तुजगतापुढे माणसाचीही कुंठितावस्था झालेली दिसते. 'तक्ता' या कवितेमध्येही त्यांचे प्रत्यंतर दिसून येते. येथे सर्वच वस्तू आपापले चौकोन सांभाळून बसल्या आहेत. सगळ्यांच्या स्वत:च्या हक्कांच्या मालकीच्या जागा आहेत. या वस्तूच्या रक्तात साखर होऊन जाण्याची एक भीती याठिकाणी सतत जाणवत राहते. पण कवी मात्र त्याबद्दल कोणतीच तक्रार करत नाही. या आक्रमणामुळे कवितेतून येणाऱ्या माणसांचे खच्चीकरण झाले आहे. ती जणू मोडकळीस आली आहेत. त्यांना स्वत:चा असा कोणताच चेहरा राहिला नाही असे वाटते.

उदा. विहिरीत पडून मेलेला मुलुखवाला, इराण्याच्या हॉटेलातला सुशिक्षित बेकार, घोड्याला गाजर खाऊ घालणारी बेढब बाई, बहिरी आणि खूप हसणारी थेरडी इ. ही माणसे अतिशय क्रियाहीन अशी आहेत. त्यांचे अस्तित्व केवळ उपभोग्य वस्तू असे आहेत. "मरणाच्या आणि विनाशाच्या सान्निध्याने कंपित झालेली अमानवीकरणाची जाणीव कोलटकरांच्या औपरोधिक जीवनदृष्टीमुळे अधिक परिणामकारक झाली आहे. हा उपरोध काही वेळा निखळ विनोदातून व्यक्त होतो." परंतु या विनोदामागे या घटनेतील क्रौर्य अधिकच गडद केले जाते. उदा. भडजी बदकाला फोडणी देणारे नाही, आई बाळाला उखळात घालणार नाही. इ. विषयाचे गांभीर्य कायम राखून विनोदाच्या द्वारे कोलटकरांनी माणूसपणाचा आधार असलेली काही सनातन तत्त्वे अधोरेखित केली आहेत. एकूणच कोलटकरांची कविता मनुष्यसृष्टीच्या भग्नावस्थेचे, वस्तुसृष्टीच्या आक्रमणाचे आणि पशुसृष्टीच्या हतबलतेचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण घडवते.

**३) मृत्यूची जाणीव :** अमानवीकरणाच्या प्रक्रियेबरोबरच कोलटकरांची कविता विनाशाची अवकळा प्राप्त झालेल्या जगाचे सामर्थ्याने दर्शन घडवते. १९६० नंतरच्या कालखंडात भरमसाठ वेगाने वाढलेली महानगरे, तेथील लोक, त्यांच्या बोथट संवेदना, माणसाच्या जगण्यावर असलेली मृत्यूची छाया या साऱ्याला कवीने आपल्या कवितेत शब्दबद्ध केलेले आहे. मृत्यूची तीव्र जाणीव आधुनिकवादी कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आधुनिक कवींच्या काव्यलेखनातून मृत्यूच्या गुढ स्वरुपाचा सतत वेध घेतलेला दिसून येतो. हॉस्पिटलच्या कवितांधून मृत्यूच्या दिशेने होणारा माणसाचा प्रवास अधोरेखित केला आहे. जन्म आणि मृत्यू या दोन बिंदूदरम्यान माणसाची होणारी ससेहोलपट अत्यंत शांतपणे निवेदक व्यक्त करतो आहे. जगण्याची तीव्र इच्छा आणि झपाट्याने पुढे सरकणारा काळ यांच्या ताणातून हॉस्पिटलच्या कविता आकाराला आलेल्या आहेत. या बरोबरच त्यांच्या कवितेत येणारे खेकडे, रद्दी, कांबळं ही सगळी मृत्यूचीच प्रतीके आहेत. मानवी मृत्यूच्या भीषणतेचेच हे चित्रण आहे. 'खेकडे' या कवितेत तर एकमेकांशी संवाद साधल्याप्रमाणे सर्व घडामोडीचं कथन केले आहे. लहान मुलाला ज्याप्रमाणे बागलबुवासारख्या काल्पनिक गोष्टींची भीती घातली जाते. त्याप्रमाणे खेकडे डोळे खाणार असल्याची भीती याठिकाणी व्यक्त होते. हे खेकडे डोळे कधी खाणार आहेत. याबद्दलही कवीने भाष्य केले आहे.

"तुझेच डोळे खाणारायत तू म्हणशील तेव्हा
की झाल काम संबंध मिटला जगताना" (पृ.१२८)

याठिकाणी जणू काही इथला व्याप सांभाळून झाला आहे. जे भौतिक आयुष्य वाट्याला आले आहे. ते जगून झाले आहे. आणि आता हा मृत्यू येणार आहे. पण ते कवीला माहीत आहे. त्याच्या भीषणतेला तो घाबरत नाही. त्याला यायचं तेव्हा येऊ दे असा त्याचा सूर आहे. हॉस्पिटलमधल्या कवितांमध्येही असाच सवयीचा सूर आहे. त्यामध्ये कोणताही त्रागा नाही. हॉस्पिटलमध्ये रूग्णाला डॉक्टर मलमूत्र तपासणी करून घेण्यास सांगतात. त्यासाठी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये घाईगडबडीने जावे लागते. याठिकाणी सईला निवेदक येताना थर्मासभर रक्त आणायला सांगतो. रक्ताच्या तपासणीसाठी सिरींजमध्ये रक्त काढून घ्यावे लागते. पण निवेदकाने खूपदा रक्ततपासणीसाठी रक्त दिले आहे आणि आता हॉस्पिटलमधूनच तो जणू कमी झालेल्या रक्ताची भरपाई करण्यासाठी थर्मासभर रक्त

मागवत आहे. असा आभास याठिकाणी निर्माण होतो. कोलटकरांच्या बऱ्याच कवितेमध्ये असा विसंगतीचा (Absurd) सूर जाणवतो. हॉस्पिटलशी संबंधित ज्या काही कविता याठिकाणी येतात. त्यातून एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते. ती म्हणजे याठिकाणी जगण्याची एक अखंड धडपड चालली आहे. जन्म–मृत्यूच्या द्वंदाची त्यामधील ताणाची जाणीव या कवितांमधून होते.

"एक दोन तीन चार पाच काचेच्या
बोटभर पोकळीत पुन: पुन: जमणारा
सॅलाइनचा थेंब विश्वाचं केंद्र होऊन राहीलाय
उजवा हात संबंध आखडून गेलाय" (पृ.११७)

दवाखान्यात रूग्णशय्येवर असताना रूग्णाच्या डोक्यात केवळ आजारीपणाचा विचार घोळत असतो. त्याच सारं लक्ष्य सलाईनच्या बाटलीकडे एकवटलं आहे. प्रत्येक थेंब हा प्रत्येक सेकंदाप्रमाणे पुढं चाललेला आहे आणि हा बोटभर पोकळीतला सलाइनचा एक थेंब निवेदकाला विश्वचं केंद्र वाटतो आहे. अख्खं विश्वं हे फक्त याच एका गोष्टीशी निगडित आहे. हॉस्पिटलमधील रूग्णाची जी अवस्था झाली आहे. त्याची प्रचिती या कवितांमधून येते. आजारीपणात रूग्णाला सतावणारी मृत्यूची जाणीव नकळतपणे या कवितांमधून जाणवत राहते. मृत्यूचे येणे ही नैसर्गिक गोष्ट असून तो कधी येईल यांचे सूचन कोणालाच करता येत नाही. कोलटकरांच्या निसर्ग या कवितेत त्याचे अटळपण स्पष्ट सूचित केले आहे.. उदा.

"डोंगरदऱ्याच्या माझ्या बापाने बांधली
झळांच्या झावळयांची खुलास मरण–
कुटी, जिच्यावर मृगजळाचे तोरण"(पृ.७१)

मरणाचीही एक यात्रा आहे. जिच्याकडे प्रत्येकाचाच प्रवास चालू असतो. मृत्यूचे सततचे सानिध्य त्यांच्या अनेक कवितांमधून दिसते. उदा. 'थ्यू येर डे' मधील गाववाल्याचा मृत्यू, 'थेरडी' मधील 'प्रक्षुब्ध रणांगणावर मेलेली घोडी', 'मुंबईनं भिकेस लावलं' मधील देवळात मेलेला कुत्रा, या सर्वांवर मृत्यूची सावली आहे. ही मरणयात्रा शोककारक असली तरी तिच्याबद्दल तक्रारीचा सूर कवितेत कुठेच जाणवत नाही. त्यामुळे त्याला अधिकच गांभीर्य प्राप्त होते. हे गांभीर्य हॉस्पिटलच्या कवितामधून अधिक तीव्र होते. रूग्णाच्या केसपेपरवरील टिप्पणीचे शीर्षक असलेल्या कवितांचा एक संचच या संग्रहात आहे. दररोजच्या रुग्णाच्या चाचण्या त्याची शारीरिक स्थिती यांची नोंद घेण्यासाठी वापरली जाणारी शब्दयोजना याठिकाणी कवितेतही वापरली आहे. आजारपण त्या दरम्यान होणारी मानसिक आणि शारीरिक धावपळ निवेदकाचे स्वत:च्या आजारपणाविषयीचे चिंतन यातून व्यक्त होते. हॉस्पिटलमध्ये असताना वेगवेगळ्या तपासण्या करत असताना, शस्त्रक्रियेपूर्वीची तयारी करताना रूग्णाच्या मनात शस्त्रक्रियेएवढाच जो ताण निर्माण होतो त्याचेही अतिशय सूक्ष्म निरीक्षण या कवितांमधून प्रत्ययाला येते. उदा.

"हजाम दारात उभा राहताच खोलीचा चौकोनीपणा
वाढतो आणि बाहेरील अंधाराचा दाब
प्रत्येक भिंतीवर तिची लांबी रूंदी लिहण्यासारखी
ठळक दिसते. प्रत्येक कोपरा स्वीकारतो
प्रकाशाचा सेटसेक्वर" (पृ.१०८)

हजामाचे येणे हे डॉक्टरांच्या येण्याचेच सूचन आहे. हजामाच्या येण्याने खोलीचा चौकोनीपणा वाढतो. त्याला खोलीच्या चार कोपऱ्याशिवाय दुसरे काही दिसत नाही. शिवाय बाहेरील अंधाराचाही दाब वाढतो. हा अंधाराचा दाब म्हणजे मृत्यूची जाणीव आहे. हजाम आल्यानंतर तो ज्या कृती करतो ती सुद्धा रूग्णाच्या दृष्टिकोणातून शस्त्रक्रियाच असते. हजामापुढे त्याचे काहीच चालत नाही. त्यामुळे अस्वस्थ निवेदकाला जीवनातल्या सनातन तत्त्वांची परत परत जाणीव होत आहे.

"जगावर सांगितलेला हक्क
झाटावर देखील शाबीत झालेला नसतो." (पृ.११०)

असहाय माणूस, त्याचे परावलंबित्व यांना कोलटकरांची कविता अधोरेखित करते. "त्यांच्या कवितेत केंद्रस्थानी असलेला माणूस हा असहाय माणसाच्या प्रतिनिधी असतो. त्याचे स्वत:चे म्हटले जाणारे आयुष्य तर त्याचे नसतेच कारण मानवी जीवनातील अगणित व्यवस्था आणि वस्तू या सगळ्यांनी त्याला पूर्णपणे पराधीन निराधार करून टाकलेले असते. आणि या दोन्हीच्या रेट्यामध्ये त्यांच्या जगण्यातील स्वतंत्रता, उत्स्फूर्तता, अस्सलपणा सगळे नष्ट करून टाकलेले असते. त्याचा आत्मसन्मानही त्याने गमावलेला असतो.

त्याने काय करावयाचे आणि काय करायचे नाही., हे सारे पूर्वपरंपरा व्यवस्था आणि दुसरे ठरवत असतात." प्रत्येकजण उपभोग्य वस्तू म्हणून समोरच्या व्यक्तीचा वापर करत असतो. त्यामुळे हा 'मी' निर्बल झाला आहे. येणाऱ्या मृत्यूला तो शांतपणे सामोरे जातो आहे.

"मिळवलेस दागदागिने अवयवांच्या मोलाने
आता अंगावेगळी ते उजळ माथ्याने" (पृ.७०)

भिन्न अर्थी शब्दांच्या एकत्रीकरणातून निर्माण होणारी ही प्रतिमा मृत्यू शांतपणे स्वीकारण्यासाठी उद्युक्त करते आहे. माणसाच्या भावना त्याचे मन या साऱ्यांना तो यापासून आलिप्त ठेवतो आहे. मृत्यूच्या भीषणतेला तो घाबरत नाही. मृत्यूचे कोणतेही अवडंबर न गाजवता अतिशय शांतपणे त्याला सामोरे जाणारा कवीचा सूर अतिशय संयमी आहे. 'भूपाळी' या कवितेतूनही असाच सूर प्रकट झाला आहे.

उदा. "उपट खुंट
आवर पसारा गुंडाळ तंबू
खुडून घे राहुट्या आता उठव छावणी
पुरे सोंग
किती ट्रिका करून दाखवशील
थोड्या असू देत शिल्लक घड्या करून सगळ्या
सावल्या पेटाऱ्यात भर" (पृ.१४०)

येथील जगणे हीच एक छातणी आहे. म्हणजेच येथून कधी ना कधी निघावे लागणार जगण्यातील प्रत्येक गोष्ट ही 'ट्रिक' आहे आणि आता हे सगळं पेटाऱ्यात भरायचं आहे. मृत्यूची चाहूल आता लागलेली आहे. याठिकाणी विनोदाच्या आवरणाखाली एक गंभीर असे वास्तव सांगितले आहे.

मरणाविषयीचे आकर्षण हा आधुनिकवादी कवींच्या काव्यलेखनाचा विशेष कोलटकरांची कविताही प्रकट करते. त्याच्या सर्वव्यापित्वाची जाणीव या कवितेत एकठिकाणी येताना दिसते.

**) भयग्रस्तता आणि असुरक्षितता:**

आधुनिक जगात माणसाला वेगवेगळ्या वृत्ती प्रवृत्तींना सामोरे जावे लागते आजूबाजूच्या घटना, माणसे आणि वस्तूही त्याचे जगणे नियत करतात जे आयुष्य तो जगतो आहे. त्याला केवळ प्रतिक्रिया देण्याचे त्याचे काम आहे. आधुनिकिकरणाने व्यवस्थेला ज्याप्रमाणे यंत्रवत बनवले त्याप्रमाणेच मनुष्याचे जगणेही बदलले.

महानगरांमध्ये जगण्यासाठी साधने शोधताना त्याला स्वत:ची मुळे सोडूनच यावे लागते. त्यामुळे त्याला आत सतत एक असुरक्षिततेची जाणीव भरून असते. कधी आपल्याच मुलुखवालयाच्या मृत्यूच्या बातमीनं तो घाबरतो. ही भयग्रस्तता महानगरातील आधुनिक माणसाच्या जगण्याचा एक भाग बनलेली आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीने असंख्य वस्तूंची निर्मिती केली. पण या वस्तूंनी माणसांच्या जगण्याचा जणू ताबाच घेतला. त्यांच्या रक्तांत साखर होऊन जाण्याची भीती त्याला वाटू लागली. या भीतीचे चित्रण 'खेकडे', 'रद्दी', काय डेंजर वारा सुटलायं, 'चट्टामट्टा' या कवितांमधून कोलटकरांनी केले आहे. 'आग' या कवितेतूनही कवीने जगण्यातील गतिमानता व्यक्त केली आहे. ही आग जगण्याची सर्व अंगे स्पर्शून जाणारी आहे. याबाबत रवींद्र किंबहुनेनी केलेली एक नोंद लक्षात घेण्यासारखी आहे. य। आगीला ते 'आधुनिक महानगरीय आयुष्यक्रमाच्या' भयावह अनुभवातून स्फुरलेली आरती' असे म्हणतात.

"पेटेल आयाळ आवरतं घे
भाजेल शेपूट सांभाळून ने
चल रे माझ्या सिंहा जरा नमतं घे
या जळत्या वर्तुळातून उडी मारून जा आरपार
इकडून तिकडे नि पुन: तिकडून इकडे
ही शून्याकार आग ही जळती मोकळीक रोजचीच आहे
ही सर्वस्वी सर्कस तुझीच आहे." (पृ.८७)

हे जगणेच एक सर्कस बनली आहे. प्रसंगी नमते घेऊन इथले व्यवहार पार पाडावे लागतात तर कधी जळत्या वर्तुळातून, संकटातून इकडून तिकडे उड्या घ्याव्या लागतात. ही आगही शून्याकार आहे. कारण इथले जगणंच चक्राकार आहे. रोजच्या रहाटगाडग्यात माणसाची अवस्था ही सर्कशीतल्या प्राण्याप्रमाणेच झाली आहे. त्याला जे पुढयात आहे त्याला तोंड द्यावे लागते. कारण हे एक बिनभुयाराचं जग आहे. जिथून बाहेर पडण्यासाठी कोणतेच मार्ग नाहीत. त्यामुळेच या लाक्षागृहाला आग लागल्यावर वाळूच्या बादल्या, पाण्याच्या टाक्या असे वरवरचे सगळे उपाय निरूपाय आहेत. हे सगळं शहरचं माणसाला

घाबरवत आहे. रोजच्या जगण्यात माणसाला अशा कोणत्या ना कोणत्या भीतीच्या सावटाखाली जगावे लागते. याचे प्रत्यय त्यांची कविता देते.

'चक्की' या कोलटकरांच्या कवितेत याच असुरक्षिततेचे चित्रण केले आहे. यंत्रसंस्कृतीने माणसाला जगण्यासाठी एक साधन मिळवून दिले पण तो त्याचा शाश्वत मार्ग नाही. त्यामुळे यानंतर पुढे काय असा प्रश्न सतत सामान्य माणसाला भेडसावतो. त्याच्या मनात ही भीती सतत ठाण मांडून बसलेली असते. 'चरित्र' या कवितेतही माणसाच्या जन्मापासूनचा एक जो आलेख मांडला आहे. तोही माणसाच्या अस्थिर जीवनाचाच एक भाग आहे. प्रत्येक गोष्ट त्याच्यावर लादली जाते आणि दैनंदिन जीवनक्रमाचा तो एक भाग बनून जातो. माणसाला लाभलेल्या जगण्याच्या अवकाशाचा येथे संकोच केला जातो. त्यामुळे त्याच्या जीवनाला अस्थिरता येत. 'काय डेंजर वारा सुटलाय' या कवितेमधूनही वस्तूजगताने माणसाचे जगणे कसे भयकारक झाले आहे. याचा प्रत्यय येतो. या वस्तूचं माणसाला आपल्या वर्चस्वाखाली ठेवतात असे दिसते.

**समारोप:**

कोलटकरांच्या एकूण ७३ कवितांचा विचार करता वेगवेगळ्या जीवन जाणिवेशी त्यांचा संबंध दिसून येतो. विशेषत: महायुद्धोत्तर कालखंडातील उदयाला आलेली महानगरे आणि त्याचे जाणीवविश्व यांच्याशी निगडीत अनेक कविता या संग्रहात आलेल्या दिसतात. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर माणसाचे जगणे बदलून गेले आर्थिक संपन्नतेबरोबरच एका वर्गाची कमालीची गरिबीही याठिकाणी होती. बकाल महानगरे, दारिद्र्य, उपासमार, शहरात स्थलांतरित झालेले लोक या साऱ्या पार्श्वभूमीवर कोलटकरांच्या काव्यलेखनाची सुरूवात झाली. याठिकाणी वेगवेगळ्या समस्यांनी घेरलेल्या माणसाला स्वत: असा कोणताच चेहरा उरला नव्हती. त्यामुळे त्याला एक तुटलेपण आले होते. मी कोण? माझे या जगातील स्थान काय? असे वेगवेगळे प्रश्न त्याला पडले होते. या 'स्व' चा घेतलेला शोध कोलटकरांच्या कवितेतही दिसून येतो.

कोलटकरांची कविता ही आधुनिकवादी विचारव्यूह प्रकट करणारी कविता आहे. रचनातंत्राच्या बाबतीतही आणि आशयाच्या अंगानेही विचार करता या संग्रहातील कविता अतिवास्तववादी आणि प्रतीकवादी जाणिवेच्या जवळ जातात. सर्वसामान्य भाषिक संकेतव्यवस्थेला ही कविता नाकारून स्वत:चे असे असांकेतिक व्यूह प्रस्थापित करून पाहते. लिंगभावनेशी संबंधित ज्या कविता या संग्रहात आहेत. त्यावरून ही गोष्ट अधिक प्रकर्षाने जाणवते. कोलटकरांच्या हॉस्पिटलच्या कवितेतील डॉक्टर आणि डब्लू.एच.ऑडन यांच्या कवितेतील 'युजेनिस्ट' यांच्यामध्ये मिलींद मालशे यांना अधिक साम्य वाटते. त्यांनी ऑडन या कविची "The Unknown citizen" ही कविता आणि ई.ई. कमिंग्ज या अमेरिकन कवीची "anyone lived in a pretty how town" या होत कविता, कवितेतील आधुनिकवादाच्या नमुन्यांची चर्चा करण्यासाठी घेतलेल्या आहेत. "या दोन्ही कवितांमध्ये आधुनिक व्यक्तिजीवनाची नामरहितता (anomymity) व्यक्तीचे कुणीही नसणेपण विविध प्रसंगामधून आणि जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करून अधोरेखित केलेले आहे. ऑडनच्या कवितेत आधुनिक समाजामधल्या विविध यंत्रणा व्यक्तींच्या चरित्राला कशा वैशिष्ट्यहीन बनवतात याचे चित्रण औपरोधिक शैलीत केले आहे."

कोलटकरांची कविताही जगण्यातील वेगवेगळ्या घटनांना अत्यंत शांतपणे सामोरी जाताना दिसते. तिच्यामध्ये तक्रारीचा असा कोणताही सूर दिसत नाही. त्यांच्या कवितेतील येणारे वस्तूंचे जग हे मानवी जगण्याला सतत शह देणारे आहे. निर्जिव वस्तूंबरोबर पशुसृष्टीच्या आक्रमणाचेही अनेक संदर्भ त्यांच्या कवितेत येतात. वस्तुसृष्टी आणि पशुसृष्टी यांच्या जगासमोर माणसाचे जगणे हे विनाशाची अक्कल आल्यासारखे आहे असे वाटते. एकूणच ७३ कवितांच्या या संग्रहातून वेगवेगळ्या जाणिवेची सूत्रे हाताशी येतात. १९७७ साली प्रसिद्ध झालेल्या या संग्रहातील कवितांचे वेगळेपण हे त्यातील आशयसूत्रांच्या आधारे याठिकाणी मांडले आहे. यानंतरचे त्यांचे संग्रह हे काळाच्या अंतराने खूप उशीरा प्रकाशित झाले. त्यातील आशयसूत्रे, त्यांची अभिव्यक्तीची पद्धती यामध्ये या संग्रहाच्या तुलनेत खूप अंतर असल्याचे दिसून येते.

❑❑❑